**बसवंत**
**हनी बी फेस्टिव्हल**
**दि. २१ ते ३० डिसेंबर २०२३**
**बसवंत गार्डन, मुखेड रोड,**
**पिंपळगाव बसवंत,**
**ता. निफाड, जि. नाशिक**
**(सकाळी १०.००**
**ते सायंकाळी ०५.००)**

# काश्मिरी मधाला जगभर पसंती...



**काश्मिरमध्ये दरवर्षी ७०० ते ८०० टन मधाचे उत्पादन होते. यामध्ये सर्वात जास्त वाटा अनंतनाग आणि श्रीनगर या जिल्ह्यांचा आहे. या व्यवसायामध्ये काश्मिरमधील तरुण तसेच स्त्रियांचा महत्त्वाचा सहभाग आहे. तेथील मधपाळांना मधमाश्यांच्या वसाहती ठेवून वर्षाला ३ ते ४ वेळा मधाचे उत्पादन मिळते. प्रत्येक वसाहतीपासून सर्वसाधारणपणे १० किलो मधाचे उत्पादन मिळते. विशेष गोडवा असलेला हा मध जगभर ग्राहकप्रिय ठरला आहे.**



काश्मिर म्हणजे स्वर्ग. या निसर्गरम्य अशा परिसरामध्ये असलेल्या अनेक महत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींबरोबरच मधही तेवढाच महत्त्वाचा आहे. काश्मिरमध्ये तयार झालेल्या मधाला सर्व जगभर मागणी आहे. देशातील इतर प्रांतांमध्ये तयार झालेल्या मधाला २०० ते ३०० रुपये प्रतिकिलो दर मिळतो तर काश्मिरमध्ये तयार झालेल्या मधाला ८०० ते १००० रुपये किलो दर मिळतो. काश्मिरमध्ये जैवविविधता मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तेथील मधाला एक वेगळ्याच प्रकारचा गोडवा आहे.

पूर्वी काश्मिरी लोकांना मधमाशी पालनाचे जास्त आकर्षण नव्हते. परंतु तेथील सफरचंदाच्या बागांमध्ये परागीभवनासाठी काही तरुणांनी मधमाश्यांचा वापर सुरू केल्यानंतर त्याला व्यवसायाचे स्वरुप आले. सफरचंदाच्या बागेत मधमाश्यांचा परागीभवनासाठी वापर केल्यानंतर उत्पादनात ४० ते ५० टक्के वाढ होते. यामुळे मधमाशी पालनाचा व्यवसाय काश्मिरमध्ये मोठ्या प्रमाणात वाढला. आज काश्मिरमध्ये मधमाश्यांच्या सुमारे ७०,००० वसाहती आहेत. परागीभवनापासून पीक उत्पादन वाढीबरोबरच मधाच्या उत्पादनातही वाढ झाली आहे. काश्मिरमध्ये मधाचे चार प्रकारचे नैसर्गिक उत्पादन मिळते. जम्मू-काश्मिरच्या जंगलामध्ये असलेल्या विविध प्रकारची झाडेझुडपे- फुले यांच्यापासून अत्यंत दुर्मिळ असा मध तयार होतो. यामुळे या मधाला चांगली मागणी आहे. काश्मिरमध्ये दरवर्षी ७०० ते ८०० टन मधाचे उत्पादन होते. यामध्ये सर्वात जास्त वाटा अनंतनाग आणि श्रीनगर या जिल्ह्यांचा आहे. या व्यवसायामध्ये काश्मिरमधील तरुण तसेच स्त्रियांचा महत्त्वाचा सहभाग आहे. तेथील मधपाळांना मधमाश्यांच्या वसाहती ठेवून वर्षाला ३ ते ४ वेळा मधाचे उत्पादन मिळते. प्रत्येक वसाहतीपासून सर्वसाधारणपणे १० किलो मधाचे उत्पादन मिळते. विशेष गोडवा असलेला हा मध जगभर ग्राहकप्रिय ठरला आहे. या व्यवसायाला चांगले भवितव्य असून, भविष्यात काश्मिरमध्ये ७ लाख मधमाश्यांच्या वसाहती करण्याचे उद्दिष्ट 'मधुक्रांती' या योजनेंतर्गत तेथील प्रशासनाने ठरविले आहे. मधाच्या उत्पादनाबरोबरच मेण, परागकण, रॉयल जेली, प्रोपोलिस, बी व्हेनम यासारखे पदार्थ निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. पुढील पाच वर्षांत मधमाशीपासून मधनिर्मिती तसेच इतर पदार्थांच्या निर्मितीतून जम्मू- काश्मिरमध्ये १.१४ लाख कुटुंबांचा सहभाग करून त्यांच्या उत्पादनात वाढ करण्याचे नियोजन केले आहे. मधमाश्यांच्या १०० वसाहतींचे संगोपन होत असताना त्यापासून कमीत कमी ४ ते ५ लोकांना रोजगार मिळतो. तसेच त्यापासून घटक पदार्थ निर्मिती, प्रक्रिया तसेच विक्री यापासूनही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो. यातून काश्मिरी मधाचा गोडवा नक्कीच वाढेल. परंतु त्याचबरोबर मधमाशी व्यवसायाला चालना मिळून आजच्या तरुणाईला एक महत्त्वाचा उद्योग उपलब्ध होईल. तसेच तेथील विविध पिकांच्या उत्पादनात वाढ होईल व शेतीमधील रूचीही वाढेल. **(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)** ■